HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA



आज शुक्रवार दि. १३।२।२०१८ रोजी मराठी विभागाची सभा विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आली. (स्थळ: मराठी विभाग, दु. १३ वा.) सभेस खालील प्राध्यापक उपस्थित होते.

डॉ. संजय शिंदे (मराठी विभाग प्रमुख) — [signature]
डॉ. बाळासाहेब अनुसे — [signature]
प्रा. वर्षा कांबळे — [signature]
प्रा. एस. व्ही. धानापुणे — [signature]

सभेत खालील विषयांवर चर्चा करुन निर्णय घेण्यात आले.

विषय क्र १ - मराठी राजभाषा दिनाचे आयोजन करणे...

मराठी राजभाषा दिनानिमित्त कवि भरत दौंडकर यांचे व्याख्यान आयोजित करणे. तसेच मराठी भाषेतील लोककृतींची परंपरा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना त्याचे संकलन करायला सांगून 'लोकजागर' नावाचा विशेषांक प्रकाशित करण्याचे ठरले,

विषय क्र. २ - विद्यार्थ्यांच्या वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.

मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून ग्रंथालय भेट, मराठी भाषेविषयीच्या कवितांची ओळख करुन देणे. विद्यार्थ्यांना मराठी भाषेच्या अभिजातपणा बद्दल माहिती सांगावी. त्यासंदर्भात विभागातील प्राध्यापकांनी मार्गदर्शन करावे, असे ठरले

Scanned by CamScanner

PAGE NO:
DATE: / /

विषय क्र. ३ - महिला दिनाचे आयोजन करणे.

दि. ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन असतो. त्यानिमित्ताने विद्यार्थिनींमध्ये जागरुकता येण्यासाठी ७ ते ८ मार्च जागर आणि त्यांच्या अभिव्यक्ती प्रयोजित करावे, स्त्रियांसदर्भातील विविध विषयांवर मराठी विषय शिकणाऱ्या विद्यार्थिनींना लिहिते, बोलते करावं या उद्देशाने विविध स्पर्धा घ्याव्यात. उदा. ऊंच माझा झोका? या विषयावर विद्यार्थिनींना बोलते करावे असे ठरले. सहभागी विद्यार्थिनींना साधना साप्ताहिकाचा महिला दिन विशेषांक भेट द्यावा असे ठरले. तसेच सर्व विद्यार्थिनींना स्त्री सक्षमीकरणाची शपथ देण्याचे ठरले.

विषय क्र. ४ - तृतीय वर्ष मराठी अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करणे.

मराठी अध्यापन करणाऱ्या विशेष स्तरावरील TYBA च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करणे तसेच डॉ. दिलीप कसबे यांचे त्यानिमित्ताने व्याख्यान आयोजित करावे असे ठरले.

विषय क्र. ५ - अभ्यासक्रम पूर्तीबाबत आढावा घेणे.

विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या दृष्टीने तयारी करून घेताना अभ्यासक्रमाच्या पूर्तीसंदर्भात गृहपाठासंदर्भात चर्चा करण्यात आली.

विषय क्र. ६ - FYBCom च्या मुलांची मौखिक परीक्षा.

FYBCom च्या विद्यार्थ्यांची २० गुणांची व FYBSc च्या विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा घेण्याविषयी चर्चा करण्यात आली.

आभार मानून सभा संपली.

(सही)

मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड जि.

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA
RAJGURU NAGAR

Scanned by CamScanner